महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई या कार्यालयातील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड या संवर्गातील नामनिर्देशनाच्या कोट्यातील रिक्त पदे भरण्याकरिता निवड समितीची पुनर्रचना

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
शासन निर्णय क्रमांकः समिती-२०१६/प्र.क्र.१५३/आस्था-२

नवीन प्रशासन भवन, ८ वा मजला,
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२
दिनांक : २६ सप्टेंबर,२०१९

वाचा -

१) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय,क्र.प्रानिमं-१२१६/प्र.क्र.६५/१६/ १३-अ, दि.१३.०६.२०१८
२) मराठी भाषा विभाग, शासन निर्णय, क्र.समिती-२०१६/प्र.क्र.१५३/२०१६/ आस्था-२, दि.३१.०८.२०१६
३) मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्र.सासंस-२०१७/प्र.क्र.१०४/आस्था-२, दि.०६.०६.२०१९
४) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे पत्र क्र.सासंमं-२०१९/२१७४, दि.१२.०६.२०१९
५) मराठी भाषा विभाग,शासन परिपत्रक क्र.समिती-२०१६/प्र.क्र.१५३/आस्था-२, दि.०५.०७.२०१९

शासन निर्णय-

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील सरळसेवेच्या कोट्यातील वरिष्ठ लिपिक संवर्गातील २ पदे भरण्यास वरील अनुक्रमांक ३ येथील दि.०६.०६.२०१९ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील सरळसेवेच्या कोट्यातील पदे भरण्याकरिता अनुक्रमांक २ अन्वये समिती गठीत करण्यात आली होती. या समितीतील १ सदस्य श्री. कि.भा. सुर्यवंशी यांच्या बदलीने सदर पद रिक्त झाले आहे. त्यामुळे अनुक्रमांक ३

येथील शासन निर्णयाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याकरिता सचिव महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांच्याकडून अनुक्रमांक ४ येथील दि.१२.०६.२०१९ च्या पत्रान्वये समितीची पुनर्रचना करण्याची विनंती करण्यात आली. त्यास अनुसरुन अनुक्रमांक ५ येथील दि.०५.०७.२०१९ च्या परिपत्रकान्वये समितीची पुनर्रचना करण्यात आली.

भूतपूर्व दुय्यम सेवामंडळाच्या कक्षेतील नामनिर्देशनाच्या कोट्यातील गट-ब (अराजपत्रित) व गट-क संवर्गातील पदे भरण्यासंदर्भात अनुक्रमांक १ येथील दि.१३.०६.२०१८ च्या शासन निर्णयान्वये सुधारित कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे. त्यानुसार अनुक्रमांक ५ येथील शासन परिपत्रक दि.०५.०७.२०१९ या शासन निर्णयाद्वारे रद्द करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई येथील गट-ब (अराजपत्रित) गट-ब व गट-ड ची सरळसेवेच्या कोट्यातील पदे भरण्याकरिता अनुक्रमांक १ येथील दि.१३.०६.२०१८ च्या शासन निर्णयास अनुसरुन निवडसमितीची पुनर्रचना खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

१) अध्यक्ष	श्रीमती मीनाक्षी रा. पाटील, सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
२) मागासवर्गीय अधिकारी/सदस्य	श्री. संतोष पु. खोरगडे, उपसचिव, सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय, मुंबई
३) अल्पसंख्यांक अधिकारी/सदस्य	श्री.अ.ई.ई.शेख, उपसचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
४) सदस्य	श्री. हर्षवर्धन तु. जाधव, अवर सचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई
५) सदस्य सचिव	श्री.प्र.ना.मोरे, प्रभारी अधीक्षक,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळांच्या कक्षेतील नामनिर्देशनाच्या कोट्यातील सदरची पदे भरताना भरती प्रक्रीया निवडसूचीत व गुणांकन पद्धती यांबाबत वरील अनुक्रमांक १ येथील शासन निर्णयातील कार्यपद्धती अनुसरण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९२६१४५४४४०१३३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MANGESH PARSHURAM KUDTARKAR

Digitally signed by MANGESH PARSHURAM KUDTARKAR
DN: CN = MANGESH PARSHURAM KUDTARKAR, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = MARATHI LANGUAGE
Date: 2019.09.26 16:39:31 +05'30'

(मं. प. कुडतरकर)
कार्यासन अधिकारी

प्रत,

१) सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५
२) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरीक्षा/लेखा अनुज्ञेयता), मुंबई
३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
४) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
५) सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन-१३-अ, मंत्रालय, मुंबई
६) श्री. संतोष पु. खोरगडे, उपसचिव, सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय, मुंबई
७) श्री.अ.ई.ई.शेख, उपसचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
८) श्री. हर्षवर्धन तु. जाधव, अवर सचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई
९) अवर सचिव (आस्थापना), मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) निवड नस्ती.